म.जा.क्र.९८०२/२०२६
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग
दिनांक २४.०८.२०२६

जाहीर नोटीस

सिंधुदुर्ग जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयाकडून जाहीर नोटीसी द्वारे असे कळविण्यात येते की,

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या उपयोगाकरिता महिंद्रा स्कॉर्पिओ (वाहन क्रमांक MH-01-FD-0827) हे चारचाकी वाहन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सदर वाहनावर शासनमान्य कंत्राटी सेवा पुरवठादार संस्थांकडून बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी पद्धतीने नियमित नियुक्ती होईपर्यंत, तात्पुरत्या स्वरूपात मासिक अथवा दैनिक मानधनावर (किमान वेतन कायद्यानुसार) बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी पद्धतीने १ (एक) कुशल वाहनचालक यांची नेमणूक करणेची आहे. त्या अनुषंगाने, शासन मान्यताप्राप्त असलेल्या सेवा पुरवठादार संस्थां यांनी खालील अटी व शर्तीस अधीन राहून कुशल **वाहनचालक** (Driver) पुरविण्यासाठीचे न्यूनतम **मासिक आणि दैनिक** दरपत्रक (सर्व करासह) ही नोटीस जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे नोटिस बोर्डवर प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसाच्या आत म्हणजे दिनांक २५.०८.२०२६ पासून ते दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंत सायं. ०५.३० वाजेपर्यंत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, विधी सेवा सदन इमारत, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्गचे इमारती शेजारी, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पि.को.नं. ४१६ ८१२ येथे आणून द्यावीत.

दर पत्रकाबाबत अटी व शर्ती

१. वाहन चालक किमान १२ वी पास असावा व वाहन चालकाकडे मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्र.५९/१९८८) प्रमाणे वैध व कार्यरत असा चारचाकी वाहन चालविण्याचा परवाना आणि पुरेसा अनुभव असणे अनिवार्य आहे.

२. वाहनचालकावर कोणताही फौजदारी स्वरूपाचा गुन्हा प्रलंबित नसावा.

३. वाहनचालक हे पद कंत्राटी स्वरूपात भरण्यात येणार असल्याने वाहन चालकाला या पदावर नोकरी कायम करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

४. दर पत्रकामध्ये दैनिक दर व मासिक दर (किमान वेतन कायद्यानुसार) या दोन्हीचा स्पष्ट उल्लेख असावा.

५. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशील व तारखेसहीत मा. सचिव, जिल्हा विधी प्राधिकरण सिंधुदुर्ग यांचे नावे असावे.

६. दरपत्रक बंद लखोट्यात आणावे. जाहीर नोटीशीमधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

७. दरपत्रक बंद लखोट्यात आणावे. जाहीर नोटीशीमधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

८. सर्वात कमीत–कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रक विचारात घेण्यात येईल.

९. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष,समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश–१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश,सिंधुदुर्ग यांना राहिल.

आज दिनांक २४.०८.२०२६ रोजी माझ्या सही निशी कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

दिनांक :– २४.०८.२०२६

अध्यक्षक,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
सिंधुदुर्ग

प्रत माहितीसाठी व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी–

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सिंधुदुर्ग – ओरोस

२. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग – ओरोस

३. मा. प्रंबधक, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग (जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग च्या नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्द करणेकरीता)

४. दिवाणी न्यायालय (क. स्तर) तथा तालुका विधी सेवा समिती, देवगड, कणकवली, कुडाळ, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला,दोडामार्ग

५. जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग

६. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग

७. जिल्हा परिषद, ओरोस, सिंधुदुर्ग

८. जिल्हा बार असोसिएशन, सिंधुदुर्ग – ओरोस

९. तालुका बार असोसिएशन, देवगड, कणकवली, कुडाळ, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला,दोडामार्ग

१०. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग

११. तहसिलदार कार्यालय, देवगड, कणकवली, कुडाळ, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ला,दोडामार्ग

१२. पंचायत समिती, देवगड, कणकवली, कुडाळ, मालवण, सावंतवाडी,वेंगुर्ला दोडामार्ग

१३. जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सिधुदुर्ग